सचित्र

संगीत पद्मिनी नाटक.

हें पुस्तक

रा. रा. विठल रामजीराव यादव

यानीं

मुंबईत

धी 'जॉइन्ट-स्टॉक' प्रिंटिंग प्रेसांत

छापून प्रसिद्ध केलें.

सन १८८९.

किंमत १० आणे.

श्री

——:o:——

सांप्रत संगीत कवितांची जिकडे तिकडे विशेष गोडी लागत असल्यानें माझ्याही मनांत कांहींसा प्रयत्न करावा अशी इच्छा उत्पन्न होऊन मी हें संगीत पद्मिनी नाटकाचें पुस्तक रचिलें तें प्रिय वाचकांस सादर करितों. हा आमचा यत्न प्रथमचाच असल्यामुळें पुष्कळ चुका असण्याचा संभव आहे परंतु गुणज्ञ चतुर वाचक हंसक्षीर न्यायानें गुणच ग्रहण करतील अशी आशा करितों.

वि० रा० या०
पुस्तक कर्ता.

श्रीशंकर प्रसन्न.

संगीत पद्मिनी नाटक.

मंगलाचरण.

पद.

राग--खमाज, ताल--धुमाळी.

नीलकंठा नागभूषणा अपर्णेशा अधि नमितों ॥
वीघ्ननाशन चरणसरोजीं मस्तक हें मम दृढधरितों ॥धृ०॥
भोलानाथ गिरीजाधव दिगंबर शिव शंकरतो ॥
स्मशानवासी पिनाकपाणी गजचर्मांबरधरतो ॥ १ ॥
स्तवन करितां पावे भक्तां ऐसा भोळा शंभू तो ॥
हर हर हर स्मरतां वाचे मानव भवसिंधु तरतो ॥ २ ॥

(सूत्रधार पडद्यांतून गुलाल उडवीत बाहेर येतो.)

शार्दूलविक्रिडित.

धन्यानां गिरिकंदरेषु वसतां ज्योतिः परं ध्यायतां ॥
आनंदाश्रुकणान् पिबति शकुना निःशंकमंकेशया ॥
अस्माकं तु मनोरथो परिचित् प्रासाद वापीतटः ॥
क्रीडाकानन केलि कौतुकजुषामायुः परं क्षीयते ॥ १ ॥

अर्थ–ईश्वराच्या ठायीं निमग्न होत्साते गिरिकंदरांत वास करणारे व ज्यांच्या नयनांतून प्रेमपुरस्सर मौक्तिकवत् आनंदाश्रकण गळताहेत तेच कण त्यांच्या मांडीवर बसून निर्भय होत्साते पक्षीगण ग्रहण करिताहेत असे सत्पुरुष धन्य होत; नाहींतर आम्हीं आमच्या मनोराज्यकल्पनांनीं आम्हीं मोठमोठाले वाडे बांधूं, बागबगीचे करूं, अनेक प्रकारचीं क्रीडास्थानें बनाऊं इ० आमचें मनोराज्य पूर्ण न होतां दिवसेंदिवस आयुष्य मात्र क्षीण होत जातें.

(सूत्रधार इकडे तिकडे फिरून विचार करितो.)

सूत्रधार–अजून कां बरें प्रिया येत नाहीं, कोणत्या कारणानिमित्त विलंब लागला बरें? (आकाशाकडे पाहून) हे मेघांचे गडगडाट व चपलेचे कडकडाट ऐकूं येत आहेत तेणेंकरून पर्जन्य फार वर्षत आहे असें वाटतें म्हणूनच प्रियेला इतका विलंब लागला असावा. (पडद्याकडे कान देऊन) नुपुरांचा ध्वनी तर ऐकूं येत आहे त्यावरून खरोखर प्रिया आली असेंच वाटतें. (नटी प्रवेश करून)

नटी–आर्य, ही दासी अभिवंदन करीत आहे.

सूत्रधार–कल्याण, प्रिये, इतका विलंब कां लागला बरें? हे सभाजन पहा कसे तटस्थ होऊन चित्राप्रमाणें स्तब्ध होत्साते आपली वाट पाहत आहे! ह्यांचें मनरंजन करण्याकरितां व लोकांस बोध होण्याकरितां पद्मिणीचरित्राचें दिग्दर्शन नाटकरूपानें ह्यास्थळीं करून दाखविण्याचा माझा मानस आहे.

नटी–ठीक आहे; मग स्वामींची काय आज्ञा आहे?

सूत्रधार–त्वां मला सहाय करून मी सुचवीन त्याप्रमाणें पात्रें सिद्ध करावीस एवढेंच; बरें तर सांप्रतच्या ऋतूचें थोडेसें वर्णन करू पाहूं?

श्लोक.

विंयदुपचित मेघं भूमयः कंदलिन्यो: ॥
नव कुटज कदंबा मोदिनो गंधवाहा: ॥
शिखि कुलकल केकाराव रम्या वनांता: ॥
सुखिनमसुखिनं वा सर्वमुत्कंठयंतिः ॥ १ ॥

अर्थ- मेघांच्या समुदायांनीं युक्त आकाश, तृणांकुरांनीं युक्त भूमि, नव्या कुटजांच्या आणि कदंबाच्या पुष्पांच्या सुवासेंकरून युक्त वायु आणि मयूरांच्या मधुर शब्दांहीं रम्य वनांचे प्रांत, हे सर्व पर्जन्यकाळीं सुखी आणि दुःखी अशा सकल जगतास मदनोत्पत्ति करून संभोगाविषयीं उत्कंठित करितात.

सूत्रधार–खरोखरच आहे, एकाद्या नवयौवना स्त्रियेच्या शरिरास ह्या कोमल मेघांच्या तुषारांचा स्पर्श झाला असतां त्या मुखानें सीत्कार करून आपले नवयौवनांकुर स्वपतीखेरीज इतरांच्या दृष्टीस न पडावे एतदर्थ मोठ्या चपलतेनें आपला पदर नीट सांवरून शरिराच्छादन करितात; अशा वेळचा देखावा फार अलौकिक दिसतो.

अंक १ ला.-प्रवेश १ ला.

स्थळ-कैलास.—पात्रें शिव, पार्वती.

साकी.

राग-जोगी, ताल-धुमाळी.

क्रीडत असतां एकदीनी सती शिवाप्रति तैं सांगे ॥
मद् हृदयांतिल संशय फेडी देवा इतुकें मागे ॥
तमा दूर करी ॥ मम इच्छा पूर्ण करी ॥

शंकर—गिरिजे, अशी कोणती तुझी इच्छा आहे कथन कर, ती पूर्ण करण्यास मी सिद्ध आहें.

पार्वती—असें आहे तर स्वामिराज सांगतें,

दिंडी.

राग-लीलांबरी, ताल-दादरा.

कथनकारे हें मज गुह्य भूतनाथा ॥
नम्र होवोनि ठेविं चरणीं माथा ॥
जन्म कैसा तुह्मांसि प्राप्त आहे ॥
तात मात कीं भ्रात कोणी नोहे ॥ १ ॥

आणखीं,

साकी.

राग-जोगी, ताल-धुमाळी.

गर्भकांड हें कथन करावें समूळ मजशीं स्वामी ॥
पिंड ब्रह्मांडा उत्पत्ति कैसी हें कांहींच नेणें मी ॥
सकळा वृत्ता कळवावें ॥ माझ्या चित्ता निववावें ॥

शंकर–प्रिये, ही सर्व कथा तुला ऐकणें असेल तर आपण सप्तसागरपैलतीरीं जंबूबेटांत एकांत स्थळीं जाऊं ह्मणजे ठीक पडेल.

पार्वती–ठीक आहे जशी आपली आज्ञा. चलावें (जातात.)

शंकर–(जंबूबेटांत येऊन) प्रिये पार्वती, हें स्थळ किती सुंदर आहे पहा!!

श्लोक–मालिनी.

अगणित शुक मैना मोर हे नाचताती ॥
मधुर मधुर शब्दें शांति चित्तास देती ॥
मन बहुत रमेही पाहतां याचि लीला ॥
झडकरि अवलोकीं (या) कस्तुरीकामृगाला ॥

पार्वती–खरोखर प्राणनाथ ह्याचे डोळे केवळ स्त्रियांच्या डोळ्या-सारखेच दिसताहेत.

शंकर–ह्मणूनच स्त्रियांना मृगाक्षी ह्मणतात. असो. आतां पार्वती तुला सच्चिदानंदस्वरूपाची व जगाच्या उत्पत्तीची कथा सांगतों तिकडे नीट लक्ष दे. भलत्याच ठिकाणीं आपलें मन जाऊं देऊं नको, व ही परम पवित्र कथा श्रवण करीत असतां निद्रावश होऊं नको, जागृत ऐस व कर्णद्वारें आपलें हृदय तृप्त करून पावन हो.

पार्वती–सत्य आहे. प्राणनाथ आपली आज्ञा शिरसावंद्य आहे.

शंकर– **ओंवी.**

ध्यान ठेवोनी ऐके सुंदरी ॥ मूळ कथा श्रवण करी ॥

मनन निजध्यास ठेवी ॥ पावनकरी आत्मया ॥ १ ॥
ॐ ब्रह्मांडीं नाद उठे ॥ सोहं शब्द तें उमटे ॥
शब्दापोटीं पुरुष नटे ॥ माया उपजे तेंहुनी ॥ २ ॥
त्रिगुणात्मक सृष्टी तेथांनि पाहे। रजतमसत्व साक्षित्वें वर्तताहे ॥
ब्रह्माविष्णुमहेश ह्मणताहे ॥ शास्त्रपुराण अवलोकी ॥ ३ ॥
ब्रह्मा सृष्टी निर्माण करी ॥ विष्णु तिचें रक्षण करी ॥
शिव तिशी संहरी ॥ सृष्टीनियम चालण्या ॥ ४ ॥
ज्याशीं विराट स्वरूप ह्मणती ॥ तोची जाण गे शिवपार्वती ॥
अंतीं प्रलय होतां क्षितीं ॥ निराकाररूपें राहतसे ॥ ५ ॥
नाहीं त्याशीं माता पित्र ॥ नसे धनी कुल गोत्र ॥
जयाची करणी असे विचित्र ॥ निरंतर योगेंद्र ध्याती जया ॥६॥
तयाशी नसे कोणी शास्ता ॥ तोचि सर्वांतें मुक्तिदाता ॥
असे सकल सृष्टीचा नियंता ॥ सत्य सत्य हें गिरितनये ॥

पार्वती— साकी.

राग–जोगी ताल–धुमाळी.

पिंडामध्यें पिंड रचोनी जीवन कैसें होई ॥
निर्गुण असतां सगुणत्वाचें रूप कैसें येई ॥
सांगा मजला हें ॥ सदां चरणीं नत आहें ॥

शंकर—ऐक तर पार्वती !

होरी.

ऐक सखेगे हें गर्भकांड प्रमाण ॥ धृ० ॥
ऋतुकाळीं स्त्रीपुरुषाशी ॥ होतां संगम जाण ॥

ब्रह्मानळीं जो मदन असे तो ॥
उतरे सखे उतरे कमळीं प्रमाण ॥ ऐक० ॥ १ ॥
मासीं प्रथमचि कमळ भरे तें ॥ द्वितीयीं आप निर्माण ॥
तृतीय मासीं घटना होउनि ॥
चतुर्थी अंकुर जाण ॥ ऐक० ॥ २ ॥
पंचमासांतीं प्रकाश पावे ॥ षष्ठीं तत्वांश प्रमाण ॥
नवमासांतीं पूर्णत्व येउनि ॥
उपजे स्वरुप सुजाण ॥ ऐक० ॥ ३ ॥
मातृस्तनीं स्वारेतचि तेव्हां ॥ होतें पय निर्माण ॥
अद्भुत शक्ति असे प्रभूची ॥
वेदीं असे ह्या प्रमाण ॥ ऐक० ॥ ४ ॥

दिंडी. चाल–साधी.

कांहीं अंध बहिर्मूक होती ॥
कितेकांना कर पाद हे न होती ॥
कांहीं जण ते रोगग्रस्त झाले ॥
पूर्व कर्मांतर तयांचें उदेलें ॥

श्लोक.

शार्दूलविक्रीडित.

दुःखें अपार भवांत ह्मणुनि साधु सेविती निर्जना ॥
त्यागोनी काम दंभ मोह करिती श्रीरामआराधना ॥
प्रेमें संतत रामचरणीं अर्पिती आपुल्या मना ॥
करिती सर्वही पूर्ण यत्कृपें इच्छित त्या कामना ॥

पार्वती—स्वामीराज दुसरी मला एक शंका आली आहे ?

शंकर—ती कोणती बरें ?

पार्वती— पद.

राग-लिलावरी चाल-दादरा.

वंद्य असा जगतीं अखिल तुह्मी सुरां नरां ॥
असुनि असें स्तविता कां त्या सितावरा ॥
रावणादि असुर भजती ॥ इंद्रादि देव नमिती ॥
यक्ष गंधर्व दिक्पती ॥ यतियोगी आणि नृपती ॥
सतत मनीं नित्य स्तविती विषधरा ॥

शंकर—पार्वती ऐक,

साकी.

राग-जोगी, ताल-धुमाळी.

चरणस्पर्शे उद्धारिली गौतममुनिची भार्या ॥
ध्यान धरुनि सदां असें मी त्या दाशरथी आर्या ॥
अपर्णे ऐक स्थिती ॥ माझी स्थिर असे तैं वृत्ती ॥

आणखीं.

पद.

चाल-लावणीची.

समुद्रमंथनीं कालकूट हें विष जैं उद्भवलें ॥
तयानें त्रिभुवना ग्रासिलें ॥
पाहुनी ऐसें सुरनरकिन्नर स्थिरचर पळूं लागले ॥
अंतरीं सर्वांचि घाबरले ॥

प्रार्थिती मज ते समयीं प्रिये तें म्यां तें प्राशियलें ॥
तयांचें संकट हें निवारिलें ॥
सुरासुरादि मुनिवर अवघे चित्तीं आनंदले ॥
परि मम शरिरीं तें राहिलें ॥

दिंडी.

राग–लिलांबरी, ताल–दादरा.

तया वीर्वे शरिरिं दाह झाला ॥
धरिलें भाळीं चंद्रा शिरीं नदीला ॥
आणूनी वेष्टिले नाग शरिराला ॥
करूनी श्रमलों यत्न शमविण्याला ॥

साकी.

राग–जोगी, ताल–धुमाळी.

अंतीं जेव्हां रामनाम हें स्मरिलें निज अंतरीं ॥
शमुनी तेव्हां दाह झाली शांति निज शरिरीं ॥
ऐशी थोरी रामाची ॥ राहो आस तया चरणाची ॥

पार्वती–खरोखर आहे; स्वामिराज! रामचंद्र तसाच प्रतापि आहे. आतां मला आठवण झाली; राम वनवासी असतां म्यां सीतेचें रूप घेऊन त्यास ठकविण्याकरितां गेलें होतें; व लक्ष्मणास भेटून रामाजवळ गेलें. त्यावेळीं लक्ष्मणानें रामास सांगितलें कीं "रामचंद्रा! ही मातोश्रीसिता रावणानें भय पावून सोडून दिलेली येथें आली आहे; हीस आलिंगन द्यावें व्यर्थ वृक्षपाषाण कां आलिंगिता!" हा

लक्ष्मणाच्या भाषणाकडे किंचितूही लक्ष्य न देतां तो तसाच वृक्षपाषाण आलिंगित होता व त्यांतून "हे राम राम" असे ध्वनी निघत असत हें पाहून मला तर मोठें आश्चर्य वाटलें; पुन्हां एकदां मी लक्ष्मणास, रामचंद्रानें माझा स्वीकार करण्याविषयीं सुचविण्यास सांगितलें; तेव्हां तो पूर्णज्ञानी राम ह्मणाला "बा लक्ष्मणा! अरे ही जानकी नव्हे ही माता अपर्णादेवी आपणास ठकविण्यास आली आहे." मला त्यानें ओळखिल्यानें मी गर्वहत झाल्यें हें पाहून रामचंद्रानें माझी तेथें स्थापना करून षोडशोपचारें पूजा केली; तेव्हां मी त्यास हे रामा, तुझा सर्वत्र विजयत्र होईल असा आशीर्वाद देऊन तेथून निघालें व आपल्या चरणाजवळ आल्यें.

शंकर–ह्मणून हे पार्वती जन्ममरणादि टाळण्याकरितां ब्रह्मस्वरूपाची ओळख करून सदां श्रीरामचंद्राचें ध्यान करीत असावें.

पार्वती–स्वामी, ब्रह्मस्वरूप ह्मणजे काय हें ऐकण्याची माझी फार इच्छा आहे.

शंकर–पार्वती ब्रम्हस्वरूपाचें वर्णन ऐकण्याकरितां प्रथमतः अंतःकरणशुद्धि झाली पाहिजे, मीतूंपण, शत्रुमित्रभाव, पितापुत्रभाव, भ्रतारकांताभाव हे सर्व त्यजून निर्विकार शुद्ध चित्त करावें नंतर ब्रह्मस्वरूप वर्णन ऐकावें. (पार्वती निद्रावश होते.)

पद. राग खमाज.

ब्रह्मस्वरूप वर्णन हें ऐक सुंदरी ॥
ठेवुनिया स्वस्थ चित्त काय उद्धरी ॥
देह चतुष्टय असती ॥ स्थूळ सूक्ष्म त्यांस म्हणती ॥
असकार तेथ वसती ॥ व्यानापान वायु क्रिडती ॥
शोध करीं पाहें निज अंतरीं ॥ ब्रम्ह० ॥
जागृति स्वप्न तूर्या रमती ॥ वैखरी मध्यमा पश्यंती ॥
कंठ हृदय नाभीं असती ॥ त्रिकुट औट देह म्हणती ॥
शोधांतीं सर्व असती हीं स्वशरिरीं ॥ ब्रम्ह० ॥

(पार्वती निद्रावश झाली असें पाहून)

साकी.

राग-जोगी, ताल-धुमाळी.

मंदमति अति असति स्त्रिया ह्या गुह्या ह्यांशीं न कथणें ॥
आत्महितातें अवमानीति विपरीत ह्यांचें करणें ॥
असती मूढमती ॥ कांहीं ज्ञानातें नेणती ॥

(पार्वतीस जागृत करून) हे भवानी! त्वांही संपूर्ण कथा श्रवण केली नाहींस तथापि तुला निद्रा लागली असतां हुंकार कोठून येत होता ह्याची चौकशी केली पाहिजे. (इकडे तिकडे पाहून आश्चर्यानें) पहा! पार्वती!

साकी.

राग-जोगी, ताल-धुमाळी.

कंपित पाहुनि नक्रशरिर हें नवल बहू मन वाटे ॥

कीं मद्भक्ता आलिंगाया हृदयीं प्रेमपूर दाटे ॥
गौरीमत्सा अवलोकीं ॥ होईल धन्य हा त्रयलोकीं ॥

आणखीं काय झालें पाहिलेंस?

पार्वती-काय बरें स्वामिनाथ!!

पद.

राग-बिहाग, ताल-दादरा.

कमलावर येउनि पहा मगरींउदरीं राहिला ॥
ही सर्व कथा ऐकण्यास ॥ जगतीं ही प्रगटविण्यास ॥
योगें जन तारण्यास ॥ उत्सुक हा जाहला ॥

(मच्छिंद्र मगरीउदरांतून शंकराची स्तुति करितो.)

पद.

राग-जिल्हा, पिलू, ताल-दिपचंदी.

संकट कोण निवारी ॥ तुजविण संकट कोण निवारी ॥ धृ० ॥
दास तुझा हा मगरीउदरीं ॥ कष्टला अति भारीं ॥ तुज० ॥१॥
गौरीरमणा नंदीविहाना ॥ करी मुक्त झडकरी ॥ तुज० ॥ २ ॥
व्यथित जिवांना असति सदय तूं ॥ देशी शांति भवारी॥तुज०॥३॥
भक्तरक्षका करुणागारा ॥ येई धांव सत्वरीं ॥ तुज० ॥ ४ ॥

(शंकर मच्छिंद्रास मगरीउदरांतून मुक्त करितो.)


शंकर.
पार्वती.
मछिं०

प्रवेश २ रा.

(मच्छिंद्र शंकराची स्तुति करितो.)

मच्छिंद्र— दिंडी. राग लिलावरी, ताल–दादरा.

असे दास हा लीन चरणाशीं ॥
रक्षी रक्षी ह्या अनाथा दिनाशीं ॥
नको अव्हेरूं मज दयासिंधो ॥
तातमात तूं असासि दीनबंधो ॥
(शंकर प्रसन्न होऊन विचारितात.)

शंकर— पद.

चाल–लावणीची.

कथन करी मजशीं सुता इच्छा त्वमनीं असे ॥ कोणती ॥
मद्वरानें पूर्ण होय ती सत्यची हें परिसे ॥ सुता ॥
व्हावें तुजला इंद्रपद कीं आत्मपदा इच्छिसी ॥ बारे ॥
किंवा बारे पृथ्वीवरती सार्वभौम हा होशी ॥ बाळा ॥

मच्छिंद्र–अहाहा! ताता किती हें पुत्रावर प्रेम !!!

पद-काफी.

आस नसे मज इंद्रपदाची ॥ अथवा वैभव राज्यपदाची ॥
मागितसें मीं इतुकें देवा ॥ नित्य वडो स्मृति तव पदाची॥

शंकर– तर मग तुझी कोणती इच्छा आहे?

मच्छिंद्र–सांगतों श्रवण करावें.

पद राग-झिंझोटी.

भवसागर हा अतितरदुस्तर॥ मोहजाल असे यांतिति दुर्धर॥
ह्मणुनि शंभो दासीं कृपा कर॥ ठेवुनीं मस्तकीं तव अभयकर॥
योग सधन मशीं हाची दे वर॥ देह क्षणिक हा याशीं पूत कर॥

शंकर–हा योगमार्ग फार कठीण आहे. गृहस्थाश्रमाचा अनुभव घे मग संन्यास ग्रहण कर.

मच्छिंद्र–नको! नको! ताता संसाराचे ठायीं माझें चित्त नाहीं. ज्यां आपल्या मुखानें ब्रह्मस्वरूपाचें वर्णन ऐकिलें आहे; तेव्हांपासून माझें मन गृहस्थाश्रमाविषयीं विन्मुख आहे. मला आपण योगमार्ग सांगावा मी अरण्यांत जाऊन तपश्चर्या करणार.

शंकर–ठीक आहे, जशी तुझी इच्छा. (त्याच्या कानांत द्वादशाक्षरी मंत्र सांगून त्याच्या मस्तकावर हात ठेवून ह्मणतो)

पद.

राग-पिलू, ताल-त्रिवट.

खचितचि होशी अमर तूं बाळा ॥ धृ० ॥
योगाभ्यासें पुनीत होउनी ॥ दंडी ह्या कळिकाळा ॥ ख० ॥
तुच्छ मानुनी हें भववैभव ॥ आठवी जगपाळा ॥ ख० ॥

(जातात.)

प्रवेश ३ रा.

(मच्छिंद्र भगवीं वस्त्रें परिधान करून कुबडी कंथा घेऊन पार्वतीजवळ येतो व म्हणतो)

मच्छिंद्र- पद.

माते देईं मशीं योगभिक्षा ॥ आलों घेउनि मी गुरुदिक्षा ॥ माते० ॥
नसे भवाची मज अपेक्षा ॥ ध्याईन हृदयीं कमलाक्षा ॥ माते० ॥

पार्वती- पद.

राग-भैरवी, ताल त्रिवट.

बाळा जाऊं नको विपिनाला ॥ घोर तप करण्याला ॥
सकुमार तूं श्रमशील फारची ॥ योग कठीण सघनाला ॥ बाळा० ॥
क्रूरभयंकर पशू असती वनाला ॥ भिवावितील कीं तुजला ॥ बाळा० ॥
तव प्रेमाचा हा ममहृदयीं ॥ पूर अतिशय आला ॥ बाळा० ॥

पद.

चाल-लावणीची.

मच्छिंद्र—त्यजुनि आतां मोहाशीं माते देईं आज्ञेला ॥
तपकरण्याशीं जातों मी हा पाहें विपिनाला ॥
पुनरपि सत्यचि स्वर्गीं येइन आपुल्या दर्शनाला ॥
कृतांतादिकाची भीति असे ह्या मृन्मय शरिराला ॥
व्याघ्र कृतांतही स्पर्शु शकेना चिर आत्मियाला ॥

पार्वती—खरी गोष्ट परंतु;

पद.

चाल—लावणीची.

संसार सुखातें अमरही इच्छिती ॥
इंद्र चंद्र विष्णु शंकर हेही भवांत रमती ॥
अनुभवाविण कशीबा झाली तुजला विकृती ॥
सत्यचि पुत्रा कथन करी मज हें संप्रती ॥

मच्छिंद्र—ब्रह्मस्वरूप वर्णन जें ऐकिलें तातमुखें कानीं ॥
तें पाहुनि ममवृत्ति बदलली जावया काननीं ॥
ईशपदाविण कांहीं नसे जगीं सत्यचि हें मानी ॥
ह्मणुनि अहर्निश राहो तयाचें नामामृत आननीं ॥

पार्वती—बरें बा तुझी इच्छाच जर जाणें आहे तर सुखरूप जा.

मच्छिंद्र—ठीक आहे. अहछक !

(मछिंद्र अरण्यांत गात गात जातो,)

पद.

राग—विभास.

कमलावर कमलनयन नित्य स्मर मनीं ॥
पसरली कीर्ति ज्याची सकल त्रिभुवनीं ॥
साधुसंत सकल महंत ध्याती ज्या मनीं ॥
ऋषी मुनी त्यजुनी भवा राहिले वनीं ॥
वेदांची कुंठित् झाली ती मती ॥
शास्त्रांची त्याजपुढें चालेना गती ॥
मोहपाशीं गुंतुनि कां भ्रमविशी मती ॥
शरण जाई जगदीशा त्यजुनि दुर्वृती ॥



अंक २ रा.-प्रवेश १ ला.

——:o:——

स्थळ-राजमार्ग.

पात्रें-जालंदर-मैनावती, दासी.

(मैनावती दासींसह महालाच्या खिडकींत बसली आहे व मार्गांतून जालंदर निराधार काष्टभार घेऊन गात जात आहे.)

पद.

क्षणभंगुर संसार गड्यानों ॥ धृ० ॥
धनविषयांस्तव कां भ्रमता ॥ घेउनि माथां भार ॥ ग० ॥
देह मृगजलवत् असे हा ॥ तो ये न वारंवार ॥ ग० ॥
मृत्यू कोणा न विसरे कदाही ॥ सांगे न वेळ वार ॥ ग० ॥
अवचित् येऊनि घाला घाली ॥ प्राण असे नेणार ॥ ग० ॥
कोणी नसेचा अचल ह्या जगीं ॥ मृत्यूशीं टळणार ॥ ग० ॥
ह्मणुनि शरण त्या परमेशा ॥ बा जावें वारंवार ॥ ग० ॥
अनन्यभावें शरण रिघतां ॥ व्हाल हा भव पार ॥ ग० ॥

दासी-(आश्चर्यानें मैनावतीस सांगते) पहा! पहा! आई-साहेब! हा किती चमत्कार आहे!

साकी.

काष्टभार हा शिरावरती निराधार कीं आहे ॥
मस्तकाशीं स्पर्श न होतां निराळीच तो राहे ॥
माते अवलोकीं ॥ वाटे नवल हें मज लोकीं ॥

मैनावती–(आश्चर्यानें) खरेंच गडे ! हा मोठाच चमत्कार आहे ! आणखी—

दिंडी.

तपो तेजानें मुख शोभताहे ॥
मला वाटे हा योगिपुरुष आहे ॥
जया दर्शनें होईल नष्ट पाप ॥
जाय सकळही संसारभोगताप ॥

दासी–बरें मग आपली काय आज्ञा आहे.

मैनावती– पद.

राग–हमीर, ताल त्रिवट.

आश्रम शोधकरी, त्वरितची आश्रम शोधकरी ॥
साधुचरणामृतसेवन होतां पळती हे षड्री ॥ त्वरित० ॥
साधुजनांचें दर्शन घडतां भवताप जाय दुरी ॥ त्वरित० ॥
श्रवण करितां उपदेशामृत शांती होय उरीं ॥ त्वरित० ॥
यास्तव सखये फल पुष्पादिक सत्वरी सिद्ध करीं ॥ त्वरित० ॥
भवसिंधूतुनी पार होण्या युक्ति नसे दुसरी ॥ त्वरित० ॥

(जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ–कैलास.

पात्रें–शंकर, पार्वती, वीरभद्र, नंदी, भूतगण, मच्छिंद्र व इतर शिष्यमंडळी.

(वीरभद्र गात गात येतो.)

पद.

राग—कानडा.

भज शिवशंकर भोळानाथ ॥ चंद्रशेखर उमाकांत॥धृ०॥
शरणांगत करुणाकर भज विनायकतात ॥ भज शि० ॥
नंदीवाहन नागभूषण गंगाधर गौरीकांत ॥ भज० ॥
पंचवक्र व्याघ्रांबरधर रमे जो सदा भूतांत ॥ भज० ॥

वीरभद्र—ताता चरणाप्रत वंदन करितों.

शंकर—कल्याण! वीरभद्रा! कोठपर्यंत गमन केलें होतें?

वीरभद्र—ताता! आपली आज्ञा घेऊन इंद्रपुरीस गेलों तेथें देवेंद्रानें माझा मोठा आदरसत्कार करून पूजा केली व आपलें व मातोश्रीचें कुशलवृत्त विचारिलें. तेथें अप्सरांचें नृत्य-गायन होत असतां एकाएकीं इंद्रासन डळमळूं लागलें, तसा इंद्र भयभित होऊन त्यानें वसंत, काम, अप्सरा ह्यांस निमिषारण्यामध्यें कोणी ऋषि तप करीत आहे त्याच्या तपाचा भंग करण्याकरितां पाठविलें व तेथून हा मी आपल्या चरणाजवळ आलों.

शंकर—धिक्कार असो त्या इंद्रास! प्रेमळ भक्त ईश्वराची भक्ति करीत असतां हा त्यांस विघ्न करितो त्या पापामुळेंच त्याच्या सर्व शरिरास भगें पडलीं आहेत.

वीरभद्र—कैलासनाथ! ह्या मायेचा किती तरी चमत्कार आहे!

असा आनंदकारक उत्साह चालत असतां क्षणांत नाहींसा व्हावाना ! !

पार्वती–भोलानाथ ! इतकीं युगें इंद्र राज्यवैभव भोगीत असतां अद्याप त्याची इच्छा तृप्त होत नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. प्राणनाथ ! हें सत्य असेल तर भूलोकांतील मानव स्वर्गांतील देवांपेक्षांही विशेष ज्ञानी ह्मटले पाहिजेत. पहा, जनक, हरिश्चंद्र, भरत, नळासारखे ज्ञानी राजे सत्य ज्ञानानें राज्यवैभवाचा त्याग करून निर्जनवनामध्यें जाऊन वास करीत होते.

शंकर–प्रिये ! ह्या संसारांत मायेचें प्राबल्य कांहीं निराळ्या प्रकारचेंच आहे, हिच्या सपाट्यांतून वांचतो तो भाग्यवानच समजावयाचा. फार दिवस योगसाधन केलेले विश्वामित्रासारखे योगी देखील चंचल होतात, मग त्या स्वर्गस्थ देवांची कथा काय ? त्यांनां तर सदां वैभवाचीच इच्छा आहे.

पार्वती–मायेचें मूळ तृष्णा आहे ह्मणून आशापाशांत गुंतलेल्याचा परिणाम असा होतो; परंतु शुकजनक हरिश्चंद्रादिकासारख्या दृढनिश्चयी व विकाररहित पुरुषांस हा भवसागर तरण्यास कांहींच प्रयास पडत नाहींत.

मच्छिंद्र–सत्य आहे मातोश्री ! प्रत्येक प्राण्यास मायाच घोटाळून टाकिते; परंतु निस्पृही जन ह्या संसारांतून धैर्यरूपी नौकेंत बसून निर्भयपणें सर्वत्र गमन करीत असतात. साधु हें नामाभिधान पावलेले ह्या संसारसुखांस तुच्छ मानून वैराग्यतेच्या अमूल्य आनंदांत स्वदेहाचें सार्थक करितात.

वीरभद्र—सत्य आहे, मच्छिंद्रनाथ! आपल्या मुखारविंदांतून निघालेलीं वाक्यें अज्ञानांस देखील अमृततुल्य लाभकारक आहेत.

शंकर—मच्छिंद्रा! तुझें ह्मणणें सत्य आहे, कारण वैराग्यपद हें अभय आहे; परंतु ह्या कृत्यांत प्रारंभापासून शेवटपर्यंत जय मिळविण्याची आशा सूत्रानें हस्ती बंधन करण्याप्रमाणें आहे. हें तुला ठाऊक आहे!

दिंडी.

उर्वशीनें पुरुरव्या काय केलें ॥
मेनिकेनें गाधीजा दंडियेलें ॥
इंद्र भगांकित चंद्र क्षयी झाला ॥
भीमहस्तानें सुयोधन निमाला ॥

मच्छिंद्र—महाराज, ! हें वाक्य जे मोहांत फसतात त्याविषयींचें आहे. परंतु अंतःकरणपूर्वक उद्योग केला असतां तो निर्विघ्नपणें पार पडण्यास कठीण पडेल असें मला वाटत नाहीं. कारण जितेंद्रिय पुरुषांस माया कांहीं प्रतिबंध करूं शकत नाहीं.

शंकर—नाहीं! नाहीं! हें तुझें ह्मणणें चुकीचें आहे. व्यभिचारिणी व पतिव्रता यांत जितका भेद आहे ह्याहीपेक्षां विशेष भेद माया आणि वैराग्य ह्यांत आहे. या अवघड मार्गांतून पार पडणारा क्वचित्च आढळतो.

मच्छिंद्र—(गर्वानें) इतरांविषयीं कसेंही असो, परंतु म्यां-तरी

निश्चय केला आहे की ह्या मायेच्या मोहांत मी कधींही सांपडणार नाहीं. कदाचित् मेरु ढळेल परंतु माझा निश्चय कधींही ढळणार नाहीं.

शंकर—अभिमानयुक्त अनेक वाक्यें बोलण्यापेक्षां त्या पैकीं. सत्य करून दाखविणें हें सहस्त्रपट चांगलें आहें.

मच्छिंद्र—मायेची स्तुति ऐकणें हें विलासी पुरुषाचें काम आहे, ह्मणून तिची मिथ्या स्तुति ऐकण्यास मी इच्छितच नाहीं.

(पडद्यांत—महाराज भांगेचा घोंटा तैयार आहे.)

शंकर—ठीक आहे चलावें.

(जातात.)

अंक ३ रा.-प्रवेश १ ला.

पात्रें—मच्छिंद्र व जिजाबाई (गोरक्षमाता.)

(मच्छिंद्र कौंतलपुरांत भिक्षा मागत असतां एका श्रीमंताच्या गृहाजवळ येऊन अहलक पुकारतो. आंतून बाई मोती भरून थाळी घेऊन येते तीस मच्छिंद्र सांगतात.)

दिंडी.

मच्छिंद्र— मौक्तिकें ही न लगती मजशीं मातें ॥
अशा भिक्षेनें निजपुण्य लया जातें ॥
देई भिक्षा मजशीं बाई ऐशी ॥
जेणें होईल मम उदर तृप्ति तैशी ॥

जिजाबाई–तर मग उठावें स्वामीराज भोजनही सिद्ध आहे.

(मच्छिंद्र भोजन करून तृप्त होतो व तिचें मुख म्लान दिसल्या कारणानें तीस विचारितो.)

पद.

राग–लिलांबरी, ताल–दादरा.

मच्छिंद्र— माते तव वदन मजशीं म्लान कां दिसे ॥
चिंता तव हृदयीं कथी कोणती वसे ॥
ईशकृपा सकल संकटांशीं हरीतसे ॥
ठेवि शांति त्यातें अखिल सौख्य मिळतसे ॥

जिजाबाई–(दीर्घश्वास टाकून) काय सांगू स्वामीराज धनधान्य सर्व अनुकूल आहे; परंतु,

पद.

देस–अदिताल.

मजला सौख्यनसे बाळाचें ॥ धृ० ॥
पुत्रावीण शुन्य दिसे जग दिपकावीण गृह जैसें ॥ मज०॥
निपुत्रिक हे शद्ध मत् शरिरा जाळिती आग्नि जैसें ॥ मज०॥
प्रिय सुतावीण जिवित मजशीं तुच्छ असें हें भासे ॥ मज०॥
कुलदीपक तो पुत्र असावा येतें मम मनीं ऐसें ॥ मज०॥

मच्छिंद्र— (भस्म देऊन) माते हें शिवभस्म भक्षण कर ह्मणजे तुझी इच्छा पूर्ण होऊन शिवप्रसादेंकरून तुला सुपुत्र होईल व पुढें द्वादशवर्षांनीं मी तिर्थाटण करून येईन तेव्हां तुझा पुत्र मला दाखीव.

जिजाबाई–तथास्तु, स्वामीराज आपली कृपा असावी ह्मणजे झालें. (चरणी लागते.)

मार्च्छिद्र–कल्याण (जातो.)

(जिजाबाई रक्षा आपले पदरीं बांधते इतक्यांत शेजारणी ठकू, चिमा, रमा, ह्या येऊन तीस विचारितात.)

ठकूबाई–कायहो जिजाबाई त्या जोगड्यानें काय सांगितलं ?

जिजाबाई–त्यानें ही इबूत दिली न सांगितलं हीं खा मग तुला पोर होईल.

चिमाबाई–काय बया सांगाव असल्या बैराग्याचा नीम काय ? कायनुबायनु देत्याल न भलतच एकाद हुयाच ?

रमाबाई–अहो तुमाम्नी ठाव है मारुतीच्या देवळापसली ती गणपतराव जाधवची बायकू तुमावानीच तिला अशी पोराच ध्येस लागला हुता, तवा असाच एक बुवा आला न त्यानें कायसस तिला खाया दिलन् पघा तशीच ती कुत्री होऊन त्येचा माग गेली.

ठकूबाई–खरच बया, ह्या बैराग्यांचा इसवास नई बाई ! !

चिमाबाई–ती राख दे उकिरड्यावर फेंकून भलतच कायनू हुयाच नै तर !

रमाबाई–तुझ्या नवऱ्याला ही गोष्ट समजली तर मारमारून घेईलना !

जिजाबाई–तुह्मी सांगता तें खरें बाई पण मला पुत्राची फार आशा आहे.

ठकूबाई–अशी राखन पोर हुती मग तर लई हुती बया. (असें ह्मणून तिच्या पदराची राख सोडूं लागते तों एकाएकीं तिचा हात दुखूं लागतो.)

ठकूबाई–(मोठ्यानें ओरडून) अगआई आईग !!! (सर्वजणी घाबरून तिच्या जवळ येतात.)

चि०–र०–जि०–काय झालग ठकू ?

ठकूबाई–काय सांगूं बया माझा हात एकदम ओढल्यावानी झाला !! सर्व (घाबरून जिजाबाईस) पघितल बाई ! इथच दाखला गवसला ! फेकून द्या ती राख एकदां उकिरड्यावर नाहींतर कायतरी वंगाळवानी हुयाच. (जिजाबाई विभुती शेणखईंत टाकते व सर्वजणी आपआपल्या घरीं जातात.)

प्रवेश २ रा.

पात्रें–जिजाबाई, गोरक्ष, मच्छिंद्र.

(मच्छिंद्र बारावर्षांनीं जिजाबाईच्या गृहीं येऊन तीस पुत्राविषयीं विचारितो.)

मच्छिंद्र–अहछक !

पद—देस–आदिताल.

मातें दाखवी तव तनया ॥ धृ० ॥

शिवचर्चित भस्म असें तें न जाय कधीं विलया ॥ मा०॥
द्वादश वर्षें तिर्थाटण करुनी आलों मी तव ठाया ॥मा०॥
क्षणभंगुर देह असुनी नाशीवंत ही काया ॥ मा० ॥
पाहुनिया तव सुतानन जाणें सिद्धाश्रम पाया ॥ मा० ॥

जिजाबाई-(न ओळखून) साकी.

राग-खमाज, आदिताल.

हतभाग्या स्वामी असें मी पुत्रसुख मज नाहीं ॥
शतशः उपाय करूनी थकलें झालें नच कांहीं ॥
वाटे धिक् जिणें मजला ॥ केवीं दाखवूं वदनाला ॥

मच्छिंद्र-(आश्चर्यानें)तर मग माई त्वां मला ओळखिलें नाहींस? बारा वर्षांपूर्वी म्यां जें शिवभस्म तुजला भक्षण करण्यास दिलें होतें त्यापासून तुला पुत्र झाला नाहीं? असें कधींही घडणार नाहीं. तुजला क्षमा आहे जी कांहीं सत्य हकीकत झाली असेल ती सांग?

जिजाबाई-काय सांगूं स्वामीराज इतर स्त्रियांनीं मला पशुयोनीची भीति घातल्यामुळें म्यां तें भस्म भक्षण न करितां उकिरड्यावर टाकून दिलें.

मच्छिंद्र-(दुःखित होऊन) हर ! हर ! हर ! बाई तूं खरोखर दुर्दैवी आहेस; रोग्यास सुधा मिळत असतां ती कडू असेल असें ह्मणून त्यानें टाकावी व दरिद्यास परीस प्राप्त झाला असतां दगड ह्मणून त्यानें फेंकून द्यावा तशी अवस्था तुझी



झाली; बरें पण तें भस्म कोठें टाकलें ती जागा मला दाखविशील?

जिजाबाई–होय चला दाखवितें. (दोघें जातात व जिजाबाई उकिरड्यावरील शेणाची रास बोटानें दाखविते.)

मच्छिंद्र–(शेणाचे राशीवर कमंडलूंतील उदक सिंचन करून कांही वेळ ध्यानधारणा करितात व अंतरज्ञानानें पाहून उठतात.) ऊठ बेटा गोरक्ष, तुझें तप पुरें झालें, तूं मोठा ज्ञानी होशील. तुझ्या मातेनें तर आपल्या उदरांत जागा दिली नाहीं; परंतु धरित्रीनें आपल्या उदरांत जागा दिली व ह्या गोबरानें तुझें संरक्षण केलें हीच पृथ्वी तुझी माता झाली. (गोरक्ष राखेंतून आदेश पुकारतो व येऊन मच्छिंद्राच्या चरणीं लागतो.)

मच्छिंद्र–(गोरक्षास) आतां पुढें तुझा विचार काय आहे तें मला सांग.

गोरक्षनाथ–विचार काय असणार! जेथें आपण तेथें मी आपल्या बरोबर येणार?

जिजाबाई–नाहीं! नाहीं! बाळा मी आतां तुला जाऊं देणार नाहीं.

(मच्छिंद्राचे पाय घट्ट धरून काकुलतीनें)

पद.

भैरवी–आदिताल.

अर्पा हा मज बाळ ॥ स्वामी हो ॥
पुत्राकरितां दाही दिशा मी ॥ हिंडतें रानोमाळ ॥ स्वा० ॥१॥

पाहोनिया रूप सुंदर हें ॥ उपजे ममता जाळ ॥ स्वा० ॥ २ ॥
हर्ष न माईल त्रिभुवनीं हा ॥ पुरवा माझी आळ ॥ स्वा०॥ ३ ॥
आयुष्यांतील बहु संतोषें ॥ कंठीन ह्यासह काळ ॥ स्वा०॥४॥

(मच्छिंद्र गोरक्षास राहण्याविषयीं फार समजाविते परंतु तो ऐकत नाहीं शेवटीं निरुपाय होऊन जिजाबाई ह्मणते)

जिजाबाई—जा बा, तुझी इच्छाच जर राहण्याची नाहीं तर सुखरूप जा; परंतु घडोघडी येऊन मला भेट ह्मणजे माझे अंतःकरणास समाधान होईल.

(गोरक्षास कडकडून भेटते व तीस फार गहिंवर येतो, हें पाहून गोरक्ष ह्मणतो.)

पद

राग–कालिंगडा, ताल–त्रिवट.

माते शोकातें आवरी ॥ त्यागी मोहा सत्वरी ॥ माते० ॥
अशाश्वत हा देह असुनी ॥ फिरे काळ हा वरी ॥माते०॥
गुरुकृपेनें येईल तुझिया ॥ सुपुत्र हा उदरीं ॥ माते० ॥
स्मरण करितां श्रीहरीचें ॥ पावेल तो कैवारी ॥ माते० ॥

(गोरक्षास सांगातें घेऊन मच्छिंद्र तिर्थाटणास जातो. गोरक्षाची व मच्छिंद्राची मार्गात चुकामुक होते.)

मच्छिंद्र—आतां मच्छिष्य गोरक्षास कोठें पाहूं ! व तो मला कोठें भेटेल ! गोरक्षा ! गोरक्षा ! त्वरित येऊन मला भेट व माझें अंतःकरण शांत कर. (जातो.)

अंक ४ था.-प्रवेश १ ला.

---:o:---

स्थळ-सिंहलद्वीप. (पद्मिनीचें राज्य.)

पात्रें—पद्मिनी, सख्या, मच्छिंद्र, गवयी, भालदार इ०.

(मच्छिंद्र एका बागे जवळ येतो.)

मच्छिंद्र–(बागेंत जाऊन) काम्यकनदी ओलांडून गेल्यावर जो प्रदेश येतो तोच कामरू देश किंवा पद्मिनीचें राज्य आहे तर मला वाटतें तोच हा प्रदेश असावा. ह्या बागेची रचना तरी किती सुंदर आहे.!

पद

वैशाख मास०–ही चाल.

हा मधुरमधुर कुसुमगंध येई चहूंकडे ॥
ह्या पुष्पांवरी मधुपपंक्ति दृष्टीशीं पडे ॥
हीं शैल शृंगें हरित कशीं रम्य दिसती ॥
वृक्षगण त्यांवरि कसे गगन भेदिती ॥
हे मयुर कसे उभवूनि पुच्छ नाचती ॥
बघुनी चमत्कृति ही मती शिवपदीं जडे ॥

(मोहपावून) एकंदरीत हा प्रदेश मोठा रमणीय आहे खरा? (आठवण होऊन) अरर! पार्वती मातेनें ह्याच प्रदेशीं न जाण्याविषयीं आज्ञा केली असून मी येथें आलों धिक्कार असो अशा मातेची अवज्ञा करणाऱ्या पुत्रांस!!

(विचार करून) पण मी येथें आलों म्हणून काय झालें मी दृढ निश्चयी आहें स्त्री मोहांत कधीं ही फसणार नाहीं ! !

(एका विहिरी जवळ ध्यान धारणा करीत बसतो)

पद्मिनी कचेरी.

गवयी–(पद्मिनी आगमनानंद दर्शवितात)

चाल-इंद्रसभेची.

सभामे दोस्तों इंदरकी०–ही चाल.

सभेंत आजी पद्मिनी राणी येत असे ॥
सर्व युवतीं मंडळांत श्रेष्ट जी असे ॥
खगांत थोर वैनतेय तेवींही दिसे ॥
विराजतांच सर्व सभा मुदित होतसे ॥

(पद्मिनीयेऊन सिंहासनावर बसते.

पद्मीनी -- चाल–इंद्रसभेची.

राजा हुं मै कौमका०–ही चाल.

पद्मीन हें नामाभिदान असे ह्या देहास ॥
सिंहलद्वीपामाजी मी करी तसें राज्यास ॥
असे युवतीराज्य हें पुरद्वारीं रुद्र असे ॥
म ज्याच्या शब्दप्रभावें नर कोणी न येथ वसे ॥

गवयी– होरी.

कन्हया मारूं नको पिचकारी-भिजकी तनु ही सारी॥



अबिर गुलाल न टाकीं आह्मांवरी ॥
असूं अह्मी परनारी ॥ कन्हया० ॥
सासू श्वशुरादिक दंडिती आम्हां ॥
हें मनीं कांहीं विचारी ॥ कन्हया० ॥
फोडिशी कां तूं दधिघट अमुचे ॥
करिशी कां बळजोरी ॥ कन्हया० ॥

सख्या- चाल इंद्रसभेची.

देखो तुम मेरी०-ही चाल.

पद्मिनी हृदयांतरी वसते दया अपार ॥
जीच्या दर्शनें होतस लाभ अपरंपार ॥
सर्वहि सहाय मिळोनिया होय सुखद संसार ॥
वसती प्राणी येथ जे भोगिती गौरव फार ॥

चाल-सदर.

स्त्रियांत श्रेष्ठ असुनि तूं आमुची सरकार ॥
आज्ञा शिरीं तव वंदुनि असूं अह्मि तैयार ॥
तुजसाठीं अर्पू अह्मि अमुचे पंचही प्राण ॥
कथित असों हें पद्मिनी सत्य सत्य तूं जाण ॥

पद्मिनी- चाल-इंद्रसभेची.

सभामें दोस्तों०-ही चाल.

तुमच्याची बाहुबळें राज्य भोगितें ॥
नाहीतरी मजशी ना कोणी पूसतें ॥

चतुर मंत्री राज्ययाशीं असति स्तंभ ते ॥
शौर्य ज्यांचे ऐकतांच पळति शत्रु ते ॥

सख्या- चाल-इंद्रसभेची.

लाया हुं शहा०-ही चाल.

सदैव राहो किंकरांवरी ममताच अशी ॥
निजसुतावरी ठेविते जननी सदां जशी ॥

पद्मिन—सख्यानों शरिराशीं ह्या न पडे आजि चैन ॥
ह्याकरितां क्रिडूं चला उपवनीं जाऊन ॥

(कचेरी बरखास्त. बागेंत जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ—बाग.


पात्रें—मच्छिंद्र, पद्मिणी व सख्या.

(पद्मिनी बागेंत येते).

पद्मिनी- पद.

लब्धारीजो० ही चाल.

बहु रम्य दिसे मज उपवन हें ॥
बैसुनि वृक्षांवरती विहंगम, करिती सुस्वर गायन हे ॥
मयुरतांडव नृत्याकरिती, किलकिल शब्दें कोकील तोषिती ॥
हरीण निर्भय कैसे रमती व्याघ्र त्यांसह मोदें क्रिडती ॥
नवल अति मज वाटत हें ॥



(एक सखी येऊन पद्मिनीस)

सखी–सरकार ! बागेंत कोणी एक महान योगी आला आहे.

पद्मिनी–मग तुह्मांस आपलें कर्तव्यकर्म ठाऊक नाहीं ॥

पद.

मंत्रें मानवमन हरणें ॥ (दोन वेळ.)
मधुर वचनें महापुरुषाशीं क्षणांत स्वाधीन करणें ॥ मंत्रें० ॥
पुष्पशय्या सुखकर भोजन मधूर भाषण करणें ॥ मंत्रें० ॥
मोहपाशीं गुंतवूनी त्यां अवश्य मोहित करणें ॥ मंत्रें० ॥
चित्ताकर्षण मंत्रबळाच्या योगें बंधन करणें ॥ मंत्रें० ॥

सखी–सरकार ! आमचे प्रयत्न निष्फळ गेले व मारुतीच्या भुभुःकारापासूनही त्यास कांहीं झालें नाहीं. हा कोणी तरी महान योगी असावा.

पद्मिनी–असें आहे काय ! चला तर मग मला तें स्थळ दाखवा !

सखी–असें ह्याबाजूनें चलावें सरकार !

(पद्मिनी मच्छिंद्राजवळ येते व त्यास अवलोकन करितांच मोहित होते.)

पद्मिनी–(स्वतः) अहाहा ! काय ह्याचें रूप तरी मनोहर आहे शतशः मदन ह्याजवरून ओंवाळून टाकावे. खरोखर विधात्याची ही मोठी चूक आहे ; अशा स्वरूपवान प्राण्याच्या दैवीं भिक्षाटण करण्यास लावणें योग्य आहे काय ! अ-

शास तर एकाद्या राज्यवैभवावर बसवावयाचें होतें (उघड) महाराज! ही दासी आपणास अभिवंदन करीत आहे.

मच्छिंद्र—कल्याण.

पद्मिनी— चाल-इंद्रसभेची.

गाती हुं और नाच०—ही चाल.

स्वामी चरणीं नम्र अशी विनंती असे ॥
हा योगीवेश किंनिमित्त घेतला असे ॥
काय हेतु धरूनि मनीं पातला इथें ॥
कोण कुळगोत्रें हें शरीर भुषितसे ॥

मच्छिंद्र— साकी.

नक्रउदरीं जन्म होऊनी शंकर हा गुरु झाला ॥
हस्त कृपेचा ठेवुनि मस्तकीं उपदेशीलें मजला ॥
योग्यां कुळ नसे ॥ जग शिवमय त्यां भासे ॥

पद्मिनी—मग,—

चाल इंद्रसभेची.

गाती हुं और नाच०—ही चाल.

कां ध्यान धरुनि स्तब्ध स्वामी बैसला असे ॥
त्यागिती भवा तयां लाभ तुच्छही नसे ॥
लाविल्या शरिराशीं राख ईश तो मिळे ॥
होय असें मग खर सदां उकीरडा मळे ॥ १ ॥

आणखी,— श्लोक.

नरवेशें उपजोनी ही आलिंगी न जो कामिनी ॥

वृथाचि जन्म असे तया सेवि न जो भामिनी ॥
विधि हेतु गणोनि तुच्छ जगीं नीरीच्छ ऐसा फिरे ॥
वांया जन्म दवडोनि सदां अज्ञान मार्गीं शिरे ॥ २ ॥

श्लोक.

मच्छिंद्र–प्राणीमात्रीं मनुष्यजीव असे अत्यंत हा किमती ॥
कामी त्यासी जो तुच्छ ह्मणतसे त्याशी न होई गती ॥
मिथ्यावाद करोनी दवडी सोन्यापरि वेळ ती ॥
स्वेच्छाचारें वर्त्तत असे तो सत्यचि मूढमती ॥ ३ ॥

पद्मिनी–मग जन्माचें सार्थक काय?

आर्या.

चंद्रवदन मृगनयना हंसगति धृत रम्य नारी लाजो ॥
स्पर्श न करि तो सत्यची मूढ तया बघुनी पृथ्वि ही लाजो ॥४॥

पद्मिनी–महाराज! वृथा जन्म तर अशांचा आहे.

श्लोक.

सुहास्यवदना रामा पूर्ण कामानुरागी ॥
सुशीला मनहरणा प्रेमला कोमलांगी ॥
ऐशी मद युक्ता न सेविली नारी जयानें ॥
व्यर्थ जन्म दवडिला सत्यची कीं तयानें ॥ ५ ॥

मच्छिंद्र–छे! छे! छे! तसें नव्हे!

श्लोक.

सुख चंचल असे जें नारिशीं प्राप्तहोई ॥

सुख अचल गणतां योगसधनेंच येई ॥
नारी मोहांत भ्रमविली स्वमती जयानें ॥
व्यर्थ जन्म दवडिला सत्यचि कीं तयानें ॥ ६ ॥

पद्मिनी–(मनांत) आतां तर मोहनीमंत्राचाच प्रयोग केला पाहिजे कारण अशा वादविवादांत आपणास जय मिळेल असें दिसत नाहीं.

(पुष्पाची एक माळा मंत्रून मच्छिंद्राच्या गळ्यांत टाकिते.)

श्लोक.

सुहास्या प्रियभाषणी च युवती जैशी दुजी उर्वशी ॥
कांतीनें चंपकतुल्य असुनि ही ओष्ठींच बिंबाजशी ॥
रागें जैसी तिलोत्तमा अपसरा शोभे मुखीं चंद्रमा ॥
मिळे कामिनी येथ अशी तरी असे कीं स्वर्ग तो उत्तमा ॥७॥

मच्छिंद्र–(मंत्राचा अमल झाल्यानें किंचित् मोहून) होय कांहीं अंशीं तुझें ह्मणणें वास्तविक आहे, परंतु :–

पद.

कोकिल स्वरी सुंदर गुणवंती मिळे नारी अशी जरी ॥
स्तवन न करितां जगदीशाचें मिळेल कैसा स्वर्ग तरी ॥
साधुसमागम इच्छा न करिती स्त्रीकटाक्ष मोहें फसती ॥
ऐशी विषयासक्त मनुष्यें न कधीं स्वर्गीं वसती ॥ ८ ॥

पद.

पद्मि०–राज्यवैभव येथ मिळे तरी काय असे त्या मोक्ष सुखांत॥
तरुणी आलिंगन त्यजुनि पडती मूढची ते यांयोग असुखांत ॥

पद.

मच्छिंद्र—महान वैभव उपभोगी जरी केवीं मिळे तो मोक्षपदास॥
आठविलें न कधीं जगदीशातें पावे कैसा स्वर्गसुखांस ॥
संतसमागम ज्या न रुचे कधीं ललनामोहें भ्रमांत पडे ॥
मोहजाळीं गुंते ऐशा योगमार्ग कदां नावडे ॥

पद्मिनी—माहाराज! हें तर केवळ मदांध पुरुषांस लागू आहे, परंतु आपल्या सारख्यांस तर राज्यवैभव प्राप्त झालें असतांही ईश्वरभक्ति करून उभयलोक साधन करण्याचा मार्ग ठाऊक आहे. (पुन्हां मंत्र युक्त पुष्पांची माला टाकिते.)

मच्छिंद्र— (मोहपावून) योगविद्या तर मी पूर्ण जाणतों; परंतु संसारसुखाचा अनुभव मला घेणें आहे. गृहस्था श्रम करणारांस स्वर्ग प्राप्त होत नाहीं कीं काय?

पद्मिनी—पहा माहाराज! आपणांस ठाऊकच असेल कीं हरिश्चंद्र दिवोदास, जनकादि राजे संसारांत राहूनच तरले गेले आहेत. आतां माझ्या ह्मणण्याची प्रचिती आलीनां? अहो प्रत्यक्ष आपले पिता शंकरदेखील संसार करूनच आहेत.

मच्छिंद्र—सत्य आहे गृहस्थाश्रम पाळून मोक्षपद मिळाविणें हेंच फार कठिण आहे.

मोहना—(पद्मिनीची सखी येऊन) धन्य! धन्य! धन्य! महाराज! आज आपण धन्य आहां. आमच्या बाईसाहेब सांप्रत कशा शोभताहेत.

पद.

सिंहकटी पंकजपद बिंबाधरा ॥
हरिणाक्षी मनोरमा असे सुंदरा ॥
नारी जानूधनूषभ्रु शूकनासिका ॥
चक्रउरोजभूषिता गजगामिका ॥ १ ॥
(सर्व जण महाली जातात.)

अंक ५ वा प्रवेश १ ला.

—:o:—

स्थल.-अरण्य, पात्रें, गोरक्ष, कानीफ व दुसरे शिष्य वगैरे.
(एका बाजुनें कानीफ व दुसऱ्या बाजूनें गोरक्षशिष्यांसह भजन करीत येतात.)

कानीफ—राम तोरे नामकी धूमम चाई ॥ अंग खाक भभूत लगाई॥धृ॥
काननमुद्रा हाथमें माला ॥ कफनी मटींमें रंगाई ॥
जप तप प्रभुकी मनमें लगाके ॥ अलक्ष पुकारत भाई ॥राम० ॥ १ ॥
बन बन भटकत पतियां चबावत ॥ हडियां तनकी जलाई ॥
धूप नाशीतमें बस्तर लीनों ॥ पुंगिनाद बजाई ॥ राम० ॥ २ ॥
ध्यानमें तोरे प्रभू पियारे ॥ सुध बुध सारी गमाई ॥
लज्जा जगकी नकिनी कुछभी ॥ सिसपे जटियां बढाई ॥ राम० ॥ ३ ॥
मातपिताभी भूल गये सब ॥ भूले बहेन और भाई ॥
रामके ध्यानमें दुनिया भुलाके ॥ औरभी भूले सगाई ॥ राम० ॥ ४ ॥
राम तुही है हमारो वाली ॥ करेगो तुही सरसाई ॥
तनमन तोहे अरपन कीनो ॥ आगन्यातोहोरी उठाई ॥ राम० ॥ ५ ॥


गो॰
का॰

गोरक्ष- **पद**

इसतन धनकी-ही चाल.

जगत संसारमें है सारी ठगाई ॥
जिवन नही यहां है सारी बढाई ॥ धृ० ॥

ईश्वरके ध्यानमें जग छोडो ॥
जांगालियो भोगसें मूख तोडो ॥ जगत० ॥ १ ॥

भवसागरमें तरना कठन है ॥
डुबगये लाखों है मौजनमों ॥ जगत० ॥ २ ॥

मारग नहीं सिधो है भाई यहांको ॥
पौंच कहां जावे निकले कहांको ॥ जगत० ॥ ३ ॥

किसिकी लुगैयां है बेटे और भाई ॥
दुन्यामें नाहीं कोई सिवा एक सांई ॥ जगत० ॥ ४ ॥

कानीफ-(गोरक्षास पाहून) ओ हो गोरखनाथ! आदेश!

गोरक्ष-(कानीफास भेटून) आदेश! कानीफ आदेश! (इतर शिष्य परस्परांस आदेश करितात.)

कानीफ-(गोरक्षास) आपके मुलाकातसें मैं बहोत भाग्यशाली समजताहुं!

गोरक्ष-आपके दर्शनसें मुझकोभी बहोत आनंद हुवा है! शिष्योंके साथ आप कहांतक प्रवास करनेवाले हो!

कानीफ-गुरुजीकी आज्ञाको अनुसरके स्वधर्म पालन हारे हम हाल तो सेतबंध रामेसरके दर्शनको जानेका बिचार रखते है.

गोरक्ष–वाह? कानीफजी! जालंदरनाथका पंथ केवल न्यारा-ही है!

कानीफ–हां सत्य है! हमारें पंथके मुवाफक उत्तम पंथ दुसरा नहीं है.

गोरक्ष–(किंचित हांसून) ऐसा क्या? लेकीन कानीफजी, सर्व व्यापक रामतो देहरूपी देवलमें बिराजमान है, फिर रामेश्वर तक जानेकी क्या जरूर?

कानीफ–हमारे पंथमें गुरुजीने साकारमतका प्रतिपादन यथार्थ किया है, क्योंके प्रत्यक्ष्य प्रतिमाका ध्यान करनेसें चित्तकों शांति प्राप्त होती है, और अज्ञ जनको ईश्वरसरूपमें आभिरुची मिलनेके वास्ते इस मुवाफक और कोई अच्छा साधन नही है.

गोरक्ष–येही भ्रांतिमें सब लोक वेदधर्मकों भूलगये है. ईश्वर सर्वव्यापक है; और उस्नेहीये पंचतत्व पैदाकिये है उस्मेसें एक तत्व धातूपाषणादिककों ईश्वर सरूप मानके वो तत्वोंको उत्पन्न करनेवालेकों भूल जाना यह कुछ अछा मार्ग नहीं है.

कानीफ–वाहवा गोरक्षनाथ! मार्च्छद्रनाथसें जियादा आपतो निराकार मतकों पुष्टी देनेका अभिमान रखते हो!

गोरक्ष–आप भूलते हो, दांभिकोंके मुवाफक् मै कहनेवाला नहीं हीं! लेकिन करनेंवाला हूं. अच्छा कानीफजी अपन बहोत दिनसें मिलेंहैं तो मेरे मनमें जरा विद्या विनोदमें मनकों

आनंद होनेके वास्ते आपकों कुछ सव्वाल पुछनेकी इच्छा उत्पन्न हुई है!

कानीफ–हां! हां! ठीक है जो आपकों पुछना है सो खुशीसें पुछो मैं गुरुजीके प्रतापसें सच्च होवे सोही कहुंगा.

गोरक्ष–जगतमें डर किसिका है? अंधा कौन है, और सच्चा शूर वीर कौन है?

कानीफ–सुनिये गोरक्षनाथ! ये संसारमें सबसें बडा डरतो एक मृत्युका है, सन्मार्ग छोड कर केवळ मायाकों वश्य होनेवाला अंधा, और कामक्रोधादि षड्रिपूकों जितनेवाला शूर कहतें है, गोरक्षनाथ मुझकोभी आपकों कुछ प्रश्न पुछनेकी इंच्छा हुई है

गोरक्ष–बहोत आनंदसें पुछो मैभी अपनें गुरुप्रतावसें उन्हेंका जबाब दे सकुंगा.

कानीफ–संत कहोन है!

पद.

वाहवा साहेबजी हि चाल.

गोरक्ष– सुखदुख आपकों जैसा लगता ॥ वैसा सब जीव जानें ॥
मनमें वैसा अपनें विचारत ॥ वोही संत सब मानें ॥
सुनो कानीफजी ॥ वाको संत पछानोजी ॥ १ ॥

कानिफ–भक्त कहोन है?

गोरक्ष– प्रभूआज्ञाको अनुसरके ॥ प्रभूप्रीति मन राखे ॥

दांभिकत्वसें भस्म न चर्चके ॥ ईशगूणरस चाखे ॥
वोही साधूजी ॥ वाकों भक्त पछानोजी ॥ २ ॥

कानीफ–धर्मका मूल क्या है?

गोरक्ष–- पद.

लायाहुं शहाजादे—ही चाल.

और सब पांखंड है ॥ अहत जन करभूल ॥
दया दान और लीनता ॥ एही धर्मका मूल ॥ ३॥

कानीफ–चंडाल कहान है?

गोरक्ष– पद.

हर हर मुख बोले कृत्य झुटे करावे ॥
परधन और दारा युक्तिसें लूटलेवे ॥
खेलकपट बाजी भक्त जगमें कहलावे ॥
अधम नर वोही सत्य चांडाल होवें ॥

कानीफ–वाहवा गोरक्षनाथ! आपके सब जबाब सुनकर मेरा अंतःकरण बहोत आनंद पाया है! आप मंत्रतंत्रकी क्रियाभी जानते होगे.

गोरक्ष–क्रियामें तो मेरे गुरुसिवा और कोही मिल न सकेगा.

कानीफ–हां हां! अच्छा तो गोरक्षनाथ! ये आम्रके झाडसें आपके इल्मसें उस्के फलकों नीचे ऊतारो देखूं?

गोरक्ष–अच्छा (आंब्यास) चल बेटा आ जा निचें. (आंबे आपोआप खालीं येतात.) कानीफजी ये आंबतो हमनें

नीचे उतारें हैं अब आपके इल्मसें जांहां वो थे व्हां झाडके उप्पर चढाईये.

कानीफ—अच्छा (आंब्यास) जा बेटा तेरे स्थलकों आराम कर. (आंबे वृक्ष्यावर जेथच्या तेथें जाऊन लागतात.)

गोरक्ष—कानीफजी आपतो आपके गुरुसेंभी जियादा ज्ञानभांडार रखते हो.

कानीफ—नहीं! नहीं! हमारे गुरु तो बडे ज्ञानवान है उन्नोंके जैसा हाल इस दुनियामें कोही न मिल सकेगा!!

गोरक्ष-सत्य! सत्य! है! लेकिन कानीफजी मै आपकों ऐसा पुछताहूं के, आपके गुरुजी इत्ने ज्ञानवान हो तो फिर गौडबंगालेके गोपिचंदराजानें अपने हय शालके लीदमें उन्कों कौं गाड दियाहै?

कानीफ-(उभा राहून) क्य! ये आप सत्य कहते हो? ऐसा कब्बू न हो सकेगा! दुष्ट गोपिचंद राजानें हमारे गुरूजीकों लीदमें गाढनेका सबब? ऐसा हमारे गुरुजीसें उस्का क्या गुन्हा हूवाहै?

गोरक्ष—मुझें क्या खबर? आप जाकर तालाश करो.

कानीफ—अछा! लेकिन गोरक्षनाथ आपके गुरुजी तो ये योगमार्गकों कलंक लगानें जैसा उलट पंथ लेकर सिंगलद्वीपके पद्मीनसाथ विषयलंपट होकर बैठेहैं उस्से तो हमारे गुरु अछे!!

गोरक्ष–(आश्चर्यानें उभा राहून) क्या ये सत्यहै! फिरतो कानीफजी अपन दोनोंही सरखे है. अबतो किंचितही विलंब नहीं करके आपापके गुरूकी शोधमें निकलनें चाहिये.

कानीफ–बहोत खुब (दोघेही उठतात) आदेश गोरक्षनाथ–आदेश!

गोरक्ष–आदेश कानीफजी आदेश. (उभयतां भेटून स्वमार्ग धरितात.)

प्रवेश २ रा.

(नाटककार स्त्रीराज्यांत विचार करीत बसले आहेत इतक्यांत गोरक्ष येतो.)

गोरक्ष–हेंच स्त्रीराज्य असेल असें वाटतें; पण आतां ह्यांत आपला प्रवेश कसा होईल? (पुढें पाहून) ते पुढें कोण बसले आहेत बरें? (नृत्यकारांकडे जाऊन त्यांस विचारितो.) तुह्मी असे सचिंत होऊन कां बसले आहांत?

नाटक०–काय सांगावें महाराज! आज आह्मांस पद्मीनीच्या कचेरींत खेळ करण्यास जाणें आहे; परंतु काय करावें? आह्मांतील एकास शुळाची व्यथा आज एकाएकीं उत्पन्न झाल्याकारणानें आह्मी फार दुःखित आहोंत कारण जर आह्मी सरकार आज्ञेप्रमाणें आज गेलों नाहीं तर आमचीं वर्षासनें जाऊन उलट आह्मांस शिक्षा होईल ती निराळीच.

गोरक्ष–बरें मी जर तुह्मांबरोबर आलों तर चालेल! कारण मला पखवाज चांगला वाजवितां येतो.

नाटक०–हो! हो! हो! मगतर फारच चांगलें होईल व आह्मी आपले फारच आभारी होऊं. (नाटककार पखवाज आणून देतो व ह्मणतो) ऐकूं द्या तर खरें कसें वाजवितां तें. (गोरक्ष पखवाज वाजवितो व नाटककार खुष होतात. आणि गोरक्षास स्त्रीराज्यांत घेऊन जातात.)

स्थळ–पद्मिनी महाल.

पात्रें–मच्छिंद्र व पद्मिनी.

पद्मिनी–स्वामी! आज आपण असे चितायुक्त कां दिसतां? हें राज्यवैभव आपलें असून मी आपली दासी सेवेशीं तत्पर असतां आपण इतके खिन्न कां?

मच्छिंद्र–काय सांगूं प्रिये! माझा एक सत्सिष्य गोरक्ष आहे त्याची मला फार भीती वाटते, तो येथें येईल व हरप्रयत्नेंकरून मला तुजपासून घेऊन जाईल.

पद्मिनी–छिः! ह्यांत काय आहे? आपण कांहीं काळजी करूं नये. मी बाराबारा कोशांवर चौकीपहारा ठेवितें व कोणीही बैरागी येथें न येईल अशी तजवीज ठेवितें.

मच्छिंद्र–शाबास! शाबास! पद्मिनी तूं मोठी चतुर आहेस!

पद्मिनी–हा महाराज आपल्या चरणांचा प्रताप आहे. (कंचुकीस) कंचुकी! जल्दी दिवाणजीस हजीर करावें.

कंचुकी–आज्ञा सरकार! (जातो) (भालदार ललकारतो) दिवानजीके मुजरेपर निगाह रखो सरकार!

पद्मिनी–(दिवानजीस) कोणाही जोगड्यास आपल्या राज्यांत येऊं देऊं नये. बाराबारा कोशांवर पहारा ठेवावा (कानांत) कोणीही बैरागी आढळल्यास त्यास एकदम नाहींसा करून टाकावा).

दिवान–ठीक आहे, जशी सरकारची आज्ञा! (जातो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ–कचेरी.

पात्रें–मच्छिंद्र, पद्मिनी, दरबारी, नाटककार, गोरक्ष इ०

(नाटक चाललें आहे इतक्यांत मृदगांतून "उठ मच्छिंद्रा गोरक्षनाथ आला" असा ध्वनी निघतो तेणें करून मछिंद्र दचकतो व पखवाज वाजविणाराकडे (गोरक्षाकडे) लक्षलावून पाहतो व त्यास ओळखतो गुरुशिष्याची नजरानजर झाल्याबरोबर गोरक्ष आदेश पुकारतो.)

गोरक्ष—आदेश! गुरुजी आदेश!!

मच्छिंद्र—(सिंहासनावरून उडी मारून गोरक्षास भेटतो.)

पद्मिनी—क्रोध युक्त होऊन.) इतके पहारेकरी असतां हा कपटी वेषधारण केलेला जोगडा येथें कसाआला? (गोर-


म०
पद्मि०
मै०
कथेकरी

क्षास) ये बैराग्या तुझी अकल तर गेली नाहींना ! किंवा तुला कोणी भुलविलें कीं येथें मछिंद्रनाथ आहे ह्मणून ! तुला आपल्या जिविताची आशा असेल तर ह्या महाराजांचें (मछिंद्राचें) दर्शन घेऊन त्वरित निघून जा नाहीं तर फसशील.

गोरक्ष—पद्मिनीमाते तूं तर वेडी झाली आहेस ! त्वा मछिंद्रास पोपटाप्रमाणें पिंजऱ्यांत घातलास तरी तुझ्या देखतच मी उडवून नेईन! तुजपासून माझें कांहीं एक होणार नाहीं.

पद्मिनी—हो हो जोगाड्या ठाऊक आहे तूं काय करशील तें, बऱ्याबोलानें तूं येथून निघनजा, नाहीं तर बंदीखान्याचें सुख अनुभवशील.

पद.

गोरक्ष— उमज कांहीं पद्मिनी तूं सुविचारी ॥
बुडिली दुनिया अभिमानें सारी ॥ उम० ॥
लंकाधीशें अभिमानानें ॥ जाळियेलीस्वपुरी ॥उ०॥
रंभा उर्वशी गर्वहत होऊनी ॥ पळती दूरच्या दूरी ॥

पद्मिनी—(सेवकांस) पद.

बांधोनि यासीं येथूनि काढा ॥ आला कोठोनि हा योगी वेडा ॥
दिसतो आकारें योगीहा ॥ पण असे ह्याचा ठकवेश ॥
खेळोनि ठकबाजी इथे ॥ लुटील आपुला देश ॥ बांधो० ॥
जा, जा, जा, जा, जोगड्या नाहीं तर होशी काम ॥
होऊन सावध या घडी ॥ काढी आपुला माग ॥ बांधो० ॥

गोरक्ष—पळेल भामिनी भोगितो ॥ किंवा हा तव यार ॥
गुरु मछिंद्रनाथहीं ॥ मग काय असे तवभार ॥ बांधो०॥
करीन क्षणांत भस्म मी ॥ तुज सह हें तव धाम ॥
परंतु गुरुलोभामुळें ॥ नकरीं हें क्षुद्र काम ॥ बांधो ०॥

पद.

पद्मिनी—क्रूर, क्रूर, क्रूर, अरे मगरूर ॥
काळतोंड्या तूं येथुनि जाईं दूर ॥
असशी जरी जादूंत बहू पूर॥तरी करीनत ब मी चकचूर॥
जाशी कुठें बैमान, खराअज्ञान, नाहीं तुजज्ञान ॥
होशी हैराण, सत्य तूं जाण, घेईन तव प्राण ॥

मच्छिंद्र—(पद्मिनीस) प्रिये ! शांतहो, शांतहो, ह्या गोरक्षास तूं अद्याप ओळखीत नाहींस. खरोखर हा कोपला तर मजसहवर्तमान सर्वांचा एका क्षणांत नाश करून टाकील. तूं स्वस्थ ऐस. मी त्याची समजूत करितों. (गोरक्षाजवळ जाऊन) बेटा गोरक्ष ! असा कोपास काय आणितोस? ही पद्मिनी फार मायाळू आहे; आपणास कोणत्याही गोष्टीची वाण पडूं देणार नाहीं ; अरे भिक्षामागत भटकण्यांत काय हांशील आहे? येथें सुग्रास अन्न मिळून रत्नजडित वस्त्रालंकार उपभोगास मिळतील. मी तर राजा बनलोंच आहें. तुझी युवराज्यीं स्थापना करितों ह्मणजे झालें. मग अरण्यवासांत शीतउष्णांतून फिरण्याची पंचाईत पडणार नाहीं ! ! !

गोरक्ष—सत्य आहे गुरुजी. (एकीकडे) अद्यापपर्यंत बुवाजी-

ची कामेच्छा पुरी होत नाहीं; वाहवा! काय चमत्कार आहे! आपण तर फसलेच आणखी मलाही फसविण्यास पाहतात; मला गोंवून घेण्याकरितां किती लाडीगोडी लावीत आहेत पहा!! अहो जर मिष्टान्न भोजनाची इच्छा होती तर मग असे बैरागी कां बनलेत? कोणी डोक्यावर ओझें ठेविलें होतें? जो वेश घेतला तशी वर्तणूक ठेविलीच पाहिजे, नाहीं तर जगांत लांछनास्पद आहे. आतां आपला मतलब साधण्याकरितां ह्यांच्या ह्मणण्याप्रमाणें होय होय ह्मटलेंच पाहिजे.

मच्छिंद्र—मग मी सांगतों तसें करशीलना?

गोरक्ष—होय गुरुजी.

मच्छिंद्र–(पद्मिनीस) प्रिये पाहिलेंस माझा शिष्य कसा चतुर आहे तो!

पद्मिनी–सत्य आहे प्राणनाथ! आपण इतके ज्ञानी आहां मग आपला शिष्य काय कमी असेल!

गोरक्ष–(एकीकडे) कसें मला उंच उंच शिखरावर चढवीत आहेत! पण पक्कें लक्षांत ठेवा हा गोरक्ष दांभिक नाहीं.

पद्मिनी–(गोरक्षा जवळ येऊन) गोरक्षा! ह्या माझ्या सख्यांतून तुला आवडेल तिचा हात धर ह्मणजे मग मी तुमचा प्रीतिविवाह लावून देईन.

गोरक्ष–(एकीकडे) शाबास हिनें तर चांगलीच युक्ति चालविली आहे! काय करूं गुरुजीकडे पाहवें लागतें नाहीं तर दुष्टे तुझ्या सख्यासह तुला क्षणांत भस्म करून टा-

किलें असतें. (उघड) पद्मिनमाई ह्या तुमच्या सख्या तुजप्रमाणेंच मला मातेसमान आहेत; दुसरें, सांप्रत मला तशी इच्छाही प्राप्त झाली नाहीं.

पद्मिनी–ठीक आहे जशी तुझी मर्जी. (सर्व निघून जातात.)

(गोरक्ष मीननाथास धुण्याकरिता नदीवर घेऊन जातो.

गोरक्ष–धिक्कार ! धिक्कार ! धिक्कार ! असो अशा दांभिकपणास ह्या योगीवेष घेऊन अशी निंद्य वर्तणूक योगीजनांस अशा मोहांत पडणें किती लांछनास्पद आहे. गुरुजी इतके ज्ञानी असतां मोहपाशांत गुंतून बद्ध व्हावेना ! ही भगवंताचीच लीला कांहीं अतर्क्य आहे ! (विचार करून) गुरुजीवृक्षास पद्मिनीवल्लीचा इतका गच्च वेढा पडला आहे कीं तो सुटतां फार प्रयास पडतील. कांहीं चिंता नाहीं मी जर खरा शिष्य असेन तर अशा कोट्यावधी पद्मिनी जरी येऊन पडल्या तरी सोडवून नेल्याशिवाय राहाणार नाहीं. येथें कांहीं तरी विघ्न उत्पन्न केल्याशिवाय आपला हेतु सिद्धीस जाणार नाहीं. (आठवण होऊन) गुरुजींनीं ह्या स्वतनयास. नदी वरून धुवून आणण्यास सांगितलें आहे. ठीक आहे. त्यास आतां बरोबरच धुवून टांकितों. (जातो.)

(गोरक्ष मीननाथास दगडावर आपटून आपटून धुतो व शेवटीं त्याचें कातडें राहिल्यावर तें सुकत घालितो व जातो)

मच्छिंद्र–(गोरक्षास) गोरक्षा पुत्र मीननाथ कोठें आहे ?

गोरक्ष–महाराज ! आपल्या आज्ञे प्रमाणें त्यास धुवून बागेंतील चौथऱ्यांवर उन्हांत वाळत घातला आहे.

(पद्मिन व मच्छिंद्र दुश्चिन्हयुक्त चिन्हें झाल्यानें घाबरतात व त्वरित बागेंत जातात.)

पद्मिनी–(आपल्या पुत्राची अशी दशा पाहतांच मुर्च्छित होते.) (सावध होऊन) शिव ! शिव ! शिव ! हे बाळा मीननाथा कसारे टाकून गेलास ! आतां कोठें मी तुला पाहूं ! बाळा ! एकदां ह्या दीनमायेस येऊन भेट दे ! हर ! हर ! काय मला दुष्टेला अशी बुद्धी झाली कीं अशा प्रत्यक्ष काळाच्या हातांत म्या तुला दिलें ! बाळा मीननाथा तुजवाचून ह्या जगांत मला कोणी राहिलें नाहीं ! ! बाळा ! मीननाथा ! !

श्लोक शुद्ध कामदा.

जगत शून्य हें भासतें मला ॥
त्वरित येउनी देईं भेटिला ॥
मजासि टाकुनी दूरच्या दुरीं ॥
गमसि कां सुता दीव्यमंदिरीं ॥

दिंडी.

धांवें पावें लवकरी जगन्नाथा ॥
देईं भेटीशीं ठेवींचरणी माथां ॥
कोठें गेला टाकोनी प्रियबाळ ॥
नेई कैसा हा त्वरित तया काळ ॥

साकी.

होईल माझी कालक्रमणा कोणासंगें आतां ॥
शोकार्णवीं कां टाकुनी जाशी आपुली ही दिन माता ॥
बाळा उघडी नेत्रांला ॥ देई प्रिय चुंबन मजला ॥

ललित छंद.

अरर हायरे काय मी करूं ॥ मजशि टाकुनी जाय लेंकरूं ॥
कितिक अंतरीं धीर हा धरूं ॥ त्यजुनि गाईशीं जाय वासरूं ॥
करुनि शोक हा कंठ दाटला ॥ नयनीं अश्रुंचा सिंधु आटला ॥
कमलमूख हें कूलभूषणा ॥ त्वरित ऊघडी करी भाषणा ॥
नगरभानू हा अस्त पावला ॥ नम्र असो तुझ्या हरि पांवला ॥

पद्मिनी–(गोरक्षाकडे पाहून क्रोधानें मछिंद्रास) महाराज आपण असे अद्याप स्वस्थ बसले आहां काय ? अहो ज्यानें आपल्या पुत्राचा घात केला त्यास अझून आपण जिवंत महातां! (त्याच्या हातीं तरवार देऊन) अहो एकदम ह्याचे शीर उडवून कां टाकीत नाहीं!!

गोरक्ष–(मच्छिंद्र तरवार घेऊन मारण्यास धांवतो त्यास म्हणतो) हं ! गुरुजी, आटपा ह्या शिष्यावर प्रसाद करा, जलदी एक घाव दोन तुकडे करून टांका म्हणजे आपल्या हस्तानें मला मोक्ष प्राप्त होऊन जगांत माझी धन्यता होईल कीं स्त्रीकरितां मच्छिंद्रानें आपल्या शिष्याचें हनन केलें. गोरक्षास मछिंद्रहस्तें मुक्ति मिळाली. शेवटीं स्वामी शंकराचें वचन सत्य झालें व आपली प्रतिज्ञा मिथ्या होऊन आपण मायावश झालां.

मच्छिंद्र–(आठवण होऊन तरवार फेकून देतो व मूर्च्छित होतो.) हरहर! शिवशंकरा! (गोरक्षास) उठ बेटा गोरक्ष! स्वामी शंकर सत्य झाले व गुरुपेक्षां शिष्य अधिक झाला. (पद्मिनीस)प्रिये आतां शोकास आंवर व ह्या माझ्या प्रियशि-

ण्यास सर्वापराधांची क्षमा मागून शरण जा ह्मणजे तोच तुझ्या प्रियपुत्रास सजीव करील. तू ह्यास जाणत नाहींस; हा शंकराचा पूर्ण अंश आहे. हा कोपला तर मजसहवर्तमान क्षणांत हें ब्रह्मांडही भस्म करून टाकील.

पद्मिनी–(गोरक्षाजवळ जाऊन) गोरक्षनाथ ! सर्वापराधांची क्षमा मागून मी आपणांस अनन्यभावें शरण आहें माझा अव्हेर करूं नका.

गोरक्ष–माते पद्मिनी ! असें अघटित कर्म करूं नको. म्यांच तुझें वंदन करावें हें योग्य आहे. कारण तूं गुरुपत्नि मला मातेप्रमाणें पूज्य आहेस. तुझ्या पुत्रास मी सजीव करितों परंतु मी जें मागेन तें त्वां मला दिलें पाहिजे ह्याविषयीं मला वचन दे.

पद्मिनी–गोरक्षनाथ ! आपण जें मागाल तें मी स्वसंतोषानें देईन ह्याविषयीं हें माझें वचन आहे (हातावर हात मारिते.) (गोरक्ष मीननाथाच्या चर्मावर कमंडलूंतील उदक अभिमंत्रून सिंचन करितो तसा मीननाथ जिवंत होतो त्यास पद्मिनी एकदम आलिंगन देऊन त्याचें चुंबन घेते.)

सख्या०– पद.

(वैशाखमास०)

धन्य धन्य धन्य आजि सुदिन उगिवला ॥
पुत्र माय भेटि होय बहु तोष जाहला ॥
शृंगारुनि नम्र सर्व, आलें कीं जणू पर्व, ॥
झाले सर्व हत गर्व, ईश पावला ॥

पद्मि०—प्रियबाळा!

दिंडी.

बहुत झालासे हर्ष ह्या मनाला ॥
विलोकुनी तव प्रीय वदनांला ॥
खचित आजि हा भाग्य रवि उदेला ॥
प्रभा फांकली ही त्याची चौं दिशाला ॥


गोरक्ष—(पद्मिनीस) माता पद्मिनी! आतां आपलें वचन पूर्ण कर व गुरुजी मच्छिद्र नाथ ह्यांस माझे स्वाधीन करून दे.

पद्मि०—हाय! हाय! बा गोरक्षा! काय तूं हें मजजवळ मागितलेस? अरेरे तूं तर माझें काळीजच काढून मागत आहेस! स्वामी मच्छिद्रनाथास आपणाबरोबर नेलेंस मग मी एकटी येथें काय करूं त्यांजवांचून हें सर्व राज्य मला तुच्छवत् आहे!! (मूर्छित होते).

मच्छि०—(पद्मिनीजवळ येऊन) प्रिये आतां शोकास आंवर. आह्मांसारख्या वैराग्यांस अशा मोहांत पडणें अगदीं निंद्य आहे; आतां माझा हेतू असा आहे कीं मीननाथास राज्यासनावर बसवून आपण तिर्थाटणास जावें दुसरें त्वां देखिल सर्व संग परित्याग करून श्रीशंकराचें ध्यान करावेंस ह्मणजे तुजला अंतीं मोक्षपद प्राप्त होईल.

पद्मिनी—स्वामीची आज्ञा प्रमाण आहे.

(मीननाथास राज्याभिषेक होऊन गोरक्ष मच्छिद्र आशीर्वाद देतात.)


गोर०
मैनि०नाथ

पद.

देवो तो गवरीहर सौख्य सर्वदां ॥
क्लेश दुःख विपत्ती ही नृप जो कदां ॥
राहो मुखीं शूलपाणीं नाम हें सदां ॥
होऊनिया कीर्ति वृद्धि टळो आपदा ॥

मीननाथ–तथास्तु!!

मच्छिंद्र–पद्मिनी! अणखीं तुझी कांहीं इच्छा असेल तर सांग?

पद्मिनी–महाराज! अणखी काय सांगूं? परंतु आपली कृपाच असली तर सांगतें.

श्लोक.–भरतवाक्य.

सुखशांति असो सदैव जनीं ॥
दुरबुद्धि कदां येवो न मनीं ॥
निजदेश प्रीति ढळो न कदां ॥
शिवशंकर भद्र करोचि सदां ॥

मच्छिंद्र–तथास्तु! (पद्मिनी मछिंद्राच्या सद्गदित कंठानें पदीं लागते.)

मच्छिंद्र–(गोरक्षास) चल बेटा गोरक्ष आतां आपणास सिद्धाश्रमास जाणें आहे.

गोरक्ष–ठीक आहे. गुरुजी चलावें.

ग्रंथकर्त्याची प्रार्थना.

सुंदरमुख तुंदि०-ही चाल.

भव्यरूपचिंत्सरूप हे त्रिलोचना ॥
कामदग्ध उमारमण नंदीवाहना ॥ धृ० ॥
होऊनिया चरणीं लीन वर्णितों गुणां ॥
स्मरतांची करिशी मुक्त भवबंधना ॥
मंदमती असों ह्मणुनी करितों याचना ॥
देवा, धांवा, लावा, तवचरणीं, तवभजनीं
तवस्मरणीं, या पामरा दीनां ॥ भव्य० ॥
भवजलधी पडती विभो बहुत यातना ॥
ह्मणुनि करीं मुक्त नेईं तव भुवना ॥
बहुत असों उत्सुक अह्मीं भक्तपालना ॥
सदया, माया, राया, करी करुणा,
अघहरणा भवतरणा त्रिपुरमर्दना ॥ भव्य० ॥
नारदादि योगी नित्य करिती स्तवना ॥
नामामृत तव पिऊनि करिती विमल ह्या मना ॥
कोण नसे तारक कलि माजी तुजविना ॥
शरण सदां तव चरणीं असों हे दयाघना ॥
रक्षीं, लक्षीं, कुक्षीं, मायजसें, पाळीतसे,
बाळ कसें गौरीरमणा ॥ भव्य० ॥ ह.भ.

समाप्त.